मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# विद्युत वाहनांसाठी चार्जिंग स्थानकांचा अभाव

## विद्युत वाहने खरेदी करण्याकडील कल कमी : दोन वर्षांनंतरही पालिकेची स्थानके कागदावरच!

**पिंपरी | प्रतिनिधी**

वाहनांमुळे होणारे प्रदूषण कमी व्हावे, या उद्देशाने शासनाचे पर्यावरणपूरक विद्युत वाहने खरेदीचे धोरण असले, तरी पिंपरी-चिंचवड शहरात चार्जिंग स्थानकांचा अभाव आहे. पालिकेने २२ चार्जिंग स्थानके उभारणार असल्याचे जाहीर केले. परंतु, दोन वर्षांनंतरही ही स्थानके कागदावरच आहेत. शहरात आजमितीला ४३ हजार विजेवरील वाहने असल्याची पिंपरी-चिंचवड उपप्रादेशिक परिवहन कार्यालयाकडे नोंद आहे. विजेवरील वाहनांचा वापर वाढावा यासाठी पालिकेने शहरात २२ ठिकाणी खासगी संस्थेद्वारे चार्जिंग स्थानके उभारण्याचे नियोजन केले.

स्वत: बांधा आणि संचालित करा या तत्त्वावर स्थानके उभारली जाणार आहेत. यासाठी पालिकेला कोणताही खर्च करावा लागणार नाही. संबंधित संस्थेला जागा उपलब्ध करून दिली जाणार आहे. या जागेवर आठ वर्षांकरिता स्वत:च्या खर्चाने महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीकडून वीजपुरवठा घेणे, चार्जिंग स्थानक उभारणे आणि चालन व देखभाल करणे या बाबी संस्थेने करणे आवश्यक आहे. मात्र दोन वर्षे पालिकेच्या निविदा प्रक्रियेला प्रतिसाद मिळाला नाही. अटी-शर्ती बदलत तीन वेळा नव्याने निविदा प्रसिद्ध करावी लागली. परिणामी, पालिकेची चार्जिंग स्थानके कागदावरच आहेत. वाहनांच्या चार्जिंगसाठी स्थानके नसल्याने विजेवरील वाहने खरेदी करण्याकडील कल कमी होताना दिसत आहे.

चार्जिंग स्थानकांच्या निविदेला प्रतिसाद मिळत नव्हता. त्यामुळे तीन वेळा निविदा प्रसिद्ध करावी लागल्याने विलंब झाला. आता तीन ठेकेदार आले आहेत. पात्र-अपात्र करण्याची प्रक्रिया सुरू असल्याचे सहशहर अभियंता बाबासाहेब गलबले यांनी सांगितले.



### स्थानकांसाठी 22 ठिकाणे निश्चित

» पालिका मुख्य प्रशासकीय इमारतीचे प्रांगण, पिंपरीतील सिट्रस हॉटेलजवळ, दुर्गादेवी टेकडी, वाहतूकनगरी (निगडी), मेजर ध्यानचंद हॉकी स्टेडिअम नेहरुनगर, कोकणे चौक पिंपळे सौदागर, उपप्रादेशिक परिवहन कार्यालय, चिखली, बर्ड व्हॅली संभाजीनगर, कुस्ती संकुल भोसरी, मलनि:सारण केंद्र चिखली, लांडेवाडी भोसरी, भक्ती-शक्ती निगडी, बजाज ऑटोजवळ, संत तुकारामनगर मेट्रो स्थानक, पी. के. चौक, योगा पार्क- पिंपळे सौदागर, राजमाता जिजामाता उद्यान- पिंपळे गुरव, संतनगर उद्यान कासारवाडी, बी. डी. किल्लेदार उद्यान, वल्लभनगर, ऑटो क्लस्टर आणि राजर्षी शाहू उद्यान अशा २२ ठिकाणच्या जागा चार्जिंग स्थानकासाठी निश्चित करण्यात आल्या आहेत.

# खोट्या गॅरंटीच्या भुलथापांना मतदार बळी पडणार नाहीत

## ज्यांना संधी दिली, त्यांनी प्रश्न सोडविण्याकडे दुर्लक्ष केले : कर्जतमध्ये मेळाव्यात संजोग वाघेरेंसाठी इंडिया फ्रंटची वज्रमूठ

**पिंपरी | प्रतिनिधी**

ज्यांना तुम्ही दहा वर्षे संसदेत काम करण्याची संधी दिली. त्यांनी सर्वसामान्य मतदारांनी टाकलेला विश्वास सार्थ ठरविण्यासाठी काम करणं गरजेचं होतं. पण, त्यांनी मतदारसंघातील प्रश्न सोडविण्याकडे दुर्लक्ष केले. असंख्य गावांमधील पाण्याचा प्रश्न देखील त्यांना सोडवता आला नाही. ते आता पुन्हा गॅरंटीच्या नावाखाली फक्त आश्वासने द्यायला येतील. परंतु, त्यांच्या या खोट्या गॅरंटीच्या भुलथापांना मतदार बळी पडणार नाहीत, असे मावळ लोकसभा मतदारसंघाचे शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे व इंडिया फ्रंटचे अधिकृत उमेदवार संजोग वाघेरे पाटील यांनी म्हटले.

अधिकृत उमेदवार संजोग संजोग वाघेरे पाटील यांच्या प्रचारार्थ कर्जत येथे इंडिया फ्रंटचा संयुक्त मेळावा पार पडला. त्यावेळी ते बोलत होते. या मेळाव्याप्रसंगी कर्जत खालापूर विधानसभा उपजिल्हाप्रमुख नितीन सावंत, राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी (शरद पवार) जिल्हाध्यक्ष सुरेश टोकरे, गोपाळ शेळके, शेतकरी कामगार पक्षाचे तालुका सरचिटणीस रामशेठ राणे, कॉंग्रेस पार्टीचे तालुका अध्यक्ष संजय गवळी, तालुका अध्यक्ष शंकर भुसारी, शिवसेनेचे तालुका प्रमुख उत्तम कोळंबे,



कम्युनिस्ट पार्टीचे सदस्य दिनानाथ देशमुख, महिला संघटिका सुवर्णा जोशी, माई कोतवाल, हिराजी पाटील, शेतकरी महिला आघाडीच्या मंदाताई म्हात्रे यांच्यासह इंडिया आघाडीचे सर्व आजी-माजी पदाधिकारी, कार्यकर्ते, मोठ्या संख्येने उपस्थित होते.

संजोग वाघेरे पाटील म्हणाले की, कित्येक वर्षांपासून आम्ही पिंपरी चिंचवड शहरात सामाजिक आणि राजकीय काम करताना विचार करत होतो की, मावळच्या मतदारांनी निवडून दिलेला माणूस चांगला काय करत असावा. परंतु, दहा वर्षांत त्यांनी काम केले नाही. हे मतदारसंघातील आमच्या महिला भगिनींना पाण्यासाठी दोन-तीन किलोमीटर जावे लागत असल्याचे पाहिल्यानंतर लक्षात येते. अत्यंत जिवाळ्याचा शश म्हणजे पाणी हा जलजीवनाचा प्रश्न सोडविता का आलेला नाही, असा सवाल करत वाघेरे पाटील यांनी टीका केली. मतदारसंघात काहि ग्रामीण भागात पाणी प्रश्न सोडवून महिलांच्या डोक्यावरील हंडा उतरविण्यासाठी आपण काम करु, असे आश्वासन यावेळी त्यांनी दिले.

### 'आपल्याला त्यांचे नाव घ्यायचे नाही, ते चिडतात'

पिंपरी चिंचवड सारख्या शहरात अनेक वर्षे काम करताना राजकारणातील प्रामाणिकपणा जपण्याचा कायम प्रयत्न केला आहे. परंतु खासदार त्याच शहरातील असताना ते मला ओळखत नाहीत, असं म्हणत आहेत. त्यांना माझ्याबद्दल माहिती नसेल, पण आपल्याला त्यांच्याबद्दल काही बोलायचे नाही. त्यांच्याबद्दल काही बोलले की ते चिडतात आणि चुकीचे आरोप करतात, अशी टीका देखील यावेळी संजोग वाघेरे पाटील यांनी केली.

# ससूनमधील 'उंदीर' प्रकरण महागात!

## वैद्यकीय शिक्षण आयुक्तांनी अखेर कारवाई : अधीक्षक डॉ. तावरेंची तडकाफडकी उचलबांगडी

**पुणे | प्रतिनिधी**

ससून सर्वोपचार रुग्णालयातील अतिदक्षता विभागात (आयसीयू) दाखल रुग्णाचा उंदराने चावा घेतल्याप्रकरणी चौकशी समिती नेमण्यात आली होती. या समितीने सादर केलेल्या अहवालावर वैद्यकीय शिक्षण आयुक्तांनी अखेर कारवाई केली आहे. या प्रकरणी रुग्णालयाच्या वैद्यकीय अधीक्षकांची उचलबांगडी करण्यात आली असून, तीन तृतीय श्रेणी कर्मचाऱ्यांना कारणे दाखवा नोटीस बजाविण्यात आली आहे.

सागर दिलीप रेणुसे (वय ३०) या रुग्णाला १ एप्रिलला अतिदक्षता विभागात उंदीर चावल्याचा आरोप त्याच्या नातेवाईकांनी केला होता. त्याच रात्री रुग्णाचा मृत्यू झाला होता. त्याचे शवविच्छेदन ससून रुग्णालयात २ एप्रिलला करण्यात आले. त्यात मणक्याला गंभीर दुखापत झाल्यामुळे त्याचा मृत्यू झाल्याचे समोर आले. चौकशी समितीने शवविच्छेदन अहवालासह इतर बाबींची चौकशी केली. हा अहवाल वैद्यकीय शिक्षण संचालक डॉ. दिलीप म्हैसेकर यांच्याकडे सादर केला होता.

डॉ. म्हैसेकर यांनी या प्रकरणी वैद्यकीय अधीक्षकांसह तीन तृतीय श्रेणी कर्मचाऱ्यांवर कारवाईची शिफारस केली होती. या शिफारशीनुसार वैद्यकीय शिक्षण आयुक्त राजीव निवतकर यांनी कारवाईचे पाऊल उचलले. या प्रकरणी रुग्णालयाचे अधीक्षक डॉ. अजय तावरे यांना तत्काळ पदावरून हटविण्यात आले आहे. याचबरोबर तीन तृतीय श्रेणी कर्मचाऱ्यांना निलंबन का करू नये, अशी कारणे दाखवा नोटीस बजावली आहे. त्यांना यावर उत्तर देण्यासाठी तीन दिवसांची मुदत देण्यात आली आहे. तसेच काही वरिष्ठ अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची शिफारसही राज्य सरकारकडे करण्यात आली आहे, अशी माहिती सूत्रांनी दिली.




> ससून रुग्णालयात रुग्णाला उंदीर चावल्याप्रकरणी वैद्यकीय अधीक्षक डॉ. अजय तावरे यांना पदावरून हटविण्यात आले आहे. वैद्यकीय शिक्षण आयुक्तांनी हा निर्णय घेतला असून, नवीन अधीक्षक नेमण्याचे आदेश रुग्णालयाच्या अधिष्ठात्यांना देण्यात आले आहेत.
>
> **– डॉ. दिलीप म्हैसेकर, संचालक, वैद्यकीय शिक्षण विभाग.**

# निवडणुकीमुळे उत्तरेकडील रेल्वे गाड्यांत गर्दीचा महापूर!

## उन्हाळी सुट्यांमुळेही गाड्यांना गर्दी वाढली : तिकीट विक्री बंद करण्याची रेल्वेवर वेळ

**पुणे | प्रतिनिधी**

लोकसभा निवडणुकीमुळे उत्तरेकडे जाणाऱ्या रेल्वे गाड्यांना सध्या प्रचंड गर्दी आहे. उत्तर भारतातील स्थलांतरित कामगार मतदानासाठी मूळ राज्यात जात असल्याने गर्दी दिवसेंदिवस वाढत आहे. गर्दी कमी करण्यासाठी गाड्यांची संख्या वाढविण्यात आली आहे. असे असले तरी प्रवाशांची संख्या दुपटीहून अधिक झाल्याने तिकीट विक्री थांबविण्याचे पाऊल रेल्वे प्रशासनाला उचलावे लागत आहे.

मध्य रेल्वेच्या पुणे विभागातून एप्रिल ते जून या कालावधीत विशेष गाड्यांचा २४६ फेऱ्यांचे नियोजन आहे. यातील सुमारे ९० टक्के पुणे स्थानकातून सुटणाऱ्या अथवा येणाऱ्या आहेत. उत्तरेतील राज्यांतील मोठ्या प्रमाणात स्थलांतरित कामगार पुण्यात आहेत. लोकसभा निवडणुकीमुळे मतदानासाठी ते मूळ राज्यात परत जात आहेत. त्यांची गर्दी गाड्यांना वाढली आहे. त्यातच उन्हाळी सुट्यांमुळेही गाड्यांना गर्दी वाढली आहे. रेल्वेकडून उन्हाळी विशेष गाड्यांची संख्या वाढविण्यात आली असली तरी या गाड्यांमध्ये प्रवाशांना बसण्यासही जागा नसल्याचे चित्र आहे.

रेल्वेतील सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, अनेक राजकीय पक्षांचे प्रतिनिधी स्थलांतरित कामगारांना एकत्रपणे तिकीट काढून एकगठ्ठा घेऊन जात आहेत. विशेष गाड्यांची तिकीट विक्री करताना क्षमतेच्या दुप्पट तिकीट विक्री केली जाते. त्यानंतर गाड्यांमध्ये जास्त गर्दी होऊ नये म्हणून त्या गाडीची तिकीट विक्री थांबविली जाते. तिकीट विक्री थांबविल्यानंतरही प्रवासी गाड्यांमध्ये विनातिकीट घुसत आहेत. त्यामुळे या गाड्यांना प्रचंड गर्दी होत आहे. अनेक गाड्यांमध्ये तपासणी करण्यासाठी तिकीट तपासनीसही आतमध्ये जाऊ शकत नसल्याची परिस्थिती अनेक वेळा येत आहे.



### गर्दीचे नियोजन करण्यासाठी उपाययोजना

- रेल्वे स्थानकांवर गर्दी नियंत्रणाची व्यवस्था
- स्थानकातील गर्दीवर वरिष्ठ अधिकाऱ्यांचे सातत्याने लक्ष
- चेंगराचेंगरी टाळण्यासाठी अतिरिक्त कर्मचारी तैनात
- प्रवाशांच्या नियमनासाठी अतिरिक्त तिकीट तपासनीस
- गाडीच्या क्षमतेपेक्षा कमाल दुप्पट तिकीट विक्री
- रेल्वे स्थानकांवर पिण्याच्या पाण्याची उपलब्धता

> लोकसभा निवडणुकीच्या मतदानामुळे उन्हाळी विशेष गाड्यांना मोठी गर्दी दिसून येत आहे. गर्दीचे नियोजन करण्यासाठी रेल्वे सुरक्षा दलाची अतिरिक्त कुमक तैनात करण्यासोबत तिकीट तपासनीसांची संख्याही वाढविण्यात आली आहे. स्थानकातील गर्दीवर लक्ष ठेवून तातडीने उपाययोजना वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून केल्या जात आहेत.
>
> **- डॉ. मिलिंद हिरवे, वरिष्ठ विभागीय वाणिज्य व्यवस्थापक, मध्य रेल्वे.**

# युवकांनो परिवर्तनाचे शिलेदार व्हा!

## देशातील जनतेचा मोदी सरकारने अपेक्षाभंग केला : डॉ. अमोल कोल्हे

**पिंपरी | प्रतिनिधी**

युवकांनी काठावर बसून फक्त टाळ्या वाजवल्या तर ते परिवर्तनाचे साक्षीदार होतील. परंतु समोर येऊन या लढ्यात सामील झाले तर या परिवर्तनाचे शिलेदार होतील. त्यामुळे युवकांनी परिवर्तनाचे शिलेदार व्हावे असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे उमेदवार खासदार डॉ. अमोल कोल्हे यांनी केले.

शिरूर लोकसभेतील राष्ट्रवादी युवक काँग्रेस शरदचंद्र पवार, युवासेना, युवक काँग्रेस, आम आदमी पार्टीच्या पदाधिकाऱ्यांचा संयुक्त "युवा महाराष्ट्राभिमान मेळावा" भोसरी येथील कै. अंकुशराव लांडगे नाट्यग्रह येथे पार पडला. यावेळी मेहबूब शेख,आपचे मयूर दौंडकर,काँग्रेसचे शिवराज मोरे,युवासेनेचे विशाल ससाणे यांनी युवकांना मार्गदर्शन केले.



डॉ. अमोल कोल्हे म्हणाले की, "देशातील जनतेचा मोदी सरकारने अपेक्षाभंग केला आहे. विशेष करून युवकांना बेरोजगार करण्याचे पाप या सरकारने केले आहे. जगाचा इतिहास बघितला तर क्रांती तेव्हा घडते जेव्हा युवक मनावर घेतो. देशातील वातावरण बदललेलं आहे. केंद्रातील मोदी सरकार यावेळेस जाणार आहे, ही काळ्या दगडावरची रेष आहे. ही निवडणूक युवकांच्या अस्तित्वाची आहे. तरुणांनी प्रवाहात असणे गरजेचे आहे. युवकांनी काठावर बसून फक्त टाळ्या वाजवले तर परिवर्तनाचे साक्षीदार होतील परंतु समोर येऊन या लढ्यात सामील झाले तर या परिवर्तनाचे शिलेदार होतील. 2024 निवडणुकीचा इतिहास लिहिला जाईल तेव्हा महाराष्ट्रातील युवक संविधान वाचवायच्या लढाईमध्ये आघाडीवर होता असा इतिहास लिहिला जाईल.केंद्रातील जुलमी सत्ता बदलण्यासाठी इथला युवक नक्कीच माझी साथ देईल असेही ते म्हणाले.

युवक शहराध्यक्ष इम्रान शेख म्हणाले की, गेल्या दहा वर्षात दोन कोटी रोजगार देण्याचे आश्वासन देऊन युवकांच्या तोंडाला पाने पुसण्याचे काम या मोदी सरकारने केले. युवकांचे मूळ प्रश्नावरील लक्ष विचलितकरण्यासाठी युवकांना धार्मिक मुद्द्यांवर अडकवले जात असल्याची टीका यावेळी केली.

स्वप्नील गायकवाड म्हणाले, ज्यावेळेस सगळे आमदार भाजपचे मांडलिकत्व स्वीकारून पक्षाशी गद्दारी करत होते. तेंव्हा डॉ. अमोल कोल्हे यांनी महाराष्ट्राच्या जनतेच्या स्वाभिमानासाठी लढणाऱ्या शरद पवारांना सोडणार नाही अशी भूमिका घेतली. युवकांनी अशा निष्ठावंत उमेदवाराच्या पाठीशी राहिले पाहिजे.

या मेळाव्यास आम आदमी पक्षाचे प्रदेशाध्यक्ष मयूर दौंडकर, युवक काँग्रेसचे प्रदेश उपाध्यक्ष शिवराज मोरे, प्रदेश सरचिटणीस विजय चौधरी, आप पक्षाचे महासचिव वैजनाथ शिरसाट, आपचे संघटन मंत्री वाजीद शेख, राष्ट्रवादी युवक काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे पुणे ग्रामीण अध्यक्ष स्वप्नील गायकवाड, पुणे अध्यक्ष किशोर कांबळे, पिंपरी-चिंचवड अध्यक्ष इम्रान शेख, युवा सेनेचे संपर्क प्रमुख विशाल ससाणे, महिला अध्यक्ष ज्योती निंबाळकर, मीना जावळे, दत्तात्रय काळजे, साहिल शेख,अर्शद शेख,राहुल कुल युवराज सोनार, प्रवीण आव्हाळे, विशाल जोगदंड, सुलतान तांबोळी, अमित भालेराव,सारीकाताई हरगुडे, चंद्रकांत लोंढे, संतोष म्हात्रे सागर तापकीर,रजनीकांत गायकवाड, संतोष शिंदे, हाजीमलंग शेख आदी उपस्थित होते.

### लोकसभा मतदार संघात तुतारीच वाजणार...

» मेहबूब शेख म्हणाले की, डॉ. कोल्हे यांच्या माध्यमातून आपल्याला सर्वसामान्यांमध्ये राहणारा,त्यांच्या प्रश्नांची जाण असलेला एका शेतकऱ्याच्या मुलाच्या रूपाने उमेदवार लाभला आहे. महाराष्ट्रातील नागरिक गद्दारीला थारा देत नाहीत. महाराष्ट्रातील नागरिक महाराष्ट्राच्या स्वाभिमानासाठी लढणारे शरद पवार, डॉ.अमोल कोल्हे यांच्या पाठीशी ठामपणे उभे आहेत. विक्रमी मताधिक्याने निवडून महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार डॉ.अमोल कोल्हे हे पुन्हा एकदा दिल्लीत महाराष्ट्राचा आवाज बुलंद करतील हा विश्वास आहे. डॉ.अमोल कोल्हे हे आपल्या पहिल्याच टर्म मध्ये संसदरत्न झाले ही त्यांच्या कामाची पोचपावती आहे. त्यामुळे या लोकसभा मतदार संघात तुतारीच वाजणार हा आम्हाला विश्वास आहे.

# धग वाढल्याने रसवंती, आइस्क्रीमकडे पावले

## लहानग्यांचा आइस्क्रीमकडे ओढा, थंडगार लिंबूसरबत ज्यूसला मागणी

**पिंपरी | प्रतिनिधी**

जोपर्यंत उन्हाचे चटके जाणवत नाहीत; तोपर्यंत थंड पेयांच्या दुकानांकडे ग्राहक वळत नाहीत, असे चित्र असते. परंतु गेल्या आठ दिवसांपासून अचानक तापमानात वाढ झाली असल्यामुळे नागरिकांची पावले थंड शीतपेय व रसवंती गृहाकडे वळू लागली आहेत. उन्हाळ्याची तीव्रता वाढत असल्याने शीतपेये आणि रसवंतीगृह चालकांना थोड्याफार प्रमाणात अच्छे दिन आल्याचे दिसून येत आहे.

रस्त्याच्या बाजूला रसवंतीगृहाच्या घुंगरांचा आवाज ऐकू येत आहे. जणू रस्त्यावरून ये-जा करणाऱ्यांना तो आवाज साद घालत आहे. सर्वजण कुटुंबासह लिंबू व घातलेल्या उसाच्या रसाचा मनसोक्त आस्वाद घेतानाचे चित्र सांगवी परिसरात दिसून येत आहे. कामानिमित्त घराबाहेर पडणाऱ्यांना उन्हाच्या तडाख्यात ही शीतपेये, रसवंतीगृहे दिलासादायक वाटत असल्यामुळे या शीतपेयांना व रसवंतीगृहामध्ये ग्राहकांची मागणी वाढत असल्याचे चित्र दिसून येत आहे. थंड पाणी, कोल्ड्रिंक्स, उसाचा रस, ताक, लस्सी, सरबत, ज्यूस, आइस्क्रीम, बर्फगोळा, कुल्फी, फळे, सॅलड, भेळपुरी, पाणीपुरी, चाट अशा वेगवेगळ्या प्रकारच्या फळे व खाद्य पदार्थांची दुकाने थाटली आहेत.



उन्हाळ्यात शरीरातील पाण्याचे प्रमाण झपाट्याने कमी होत असते. त्यामुळे शरीराला ऊर्जा व तहान भागविण्यासाठी सरबत, उसाचा रस, आइस्क्रीम, कुल्फी, लिंबू-सरबत यांसारख्या थंड पदार्थांची दुकाने थाटलेली दिसत आहे. उन्हाची तीव्रता वाढल्यामुळे नागरिक उसाचा रस पिण्याला जास्त प्राधान्य देतात. अन्य शीतपेयांच्या तुलनेत उसाचा रस स्वस्त व मस्त असल्याने त्याला अधिक मागणी दिसून येते.

### ज्यूसला मागणी

परिसरात ज्यूसची बारमाही दुकाने दिसतात. विविध प्रकारचे सरबत याठिकाणी उपलब्ध आहेत. चॉकलेट शेक, कोल्ड कॉफी, लिंबू सरबत, रोझ मिल्कशेक, तसेच अननस, स्ट्रॉबेरी, चिकू, सफरचंद, संत्री, कलिंगड या फळांच्या ज्यूसची मागणी वाढली आहे. हे सर्व प्रकारचे ज्यूस साधारणपणे 10 ते 60 रुपये किमतीपर्यंत उपलब्ध आहेत

उष्णतेची धग वाढू लागली आहे. नागरिकांना तीव्र उन्हाच्या झळांचा सामना करावा लागत आहे. वाढत्या उष्णतेमुळे येणारा थकवा व शरीराचा क्षीण कमी होण्यासाठी शीतपेयांसह इतर थंडावा मिळणाऱ्या पेयास मोठ्या प्रमाणात पसंती मिळत आहे.

### लहानग्यांचा आइस्क्रीमकडे ओढा

» लहान मुलांना आइस्क्रीम पसंत असल्यामुळे संध्याकाळच्या वेळी नागरिक परिवारासोबत जाऊन आइस्क्रीमचा आनंद घेताना दिसून येत आहेत. बर्फाचा गोळाही आकर्षित करीत आहे. साधा गोळा, मावा गोळा, आइस प्लेट यांसारखे प्रकार यात उपलब्ध आहेत. आइस्क्रीम पार्लरची संख्या वाढली असली तरीही बर्फगोळ्याचे महत्त्व अद्याप टिकून आहे. लिंबू सरबत पिण्यालाही लोक पसंती देत आहेत. अनेक ठिकाणी मठ्ठा व जलजिराच्या गाड्या लावण्यात आल्या आहेत. साधारणपणे 10 ते 20 रुपये ग्लास मिळणारा हा जलजिरा सर्वांनाच आवडतो. महाविद्यालय, शाळा, मंगल कार्यालय या भागांमध्ये या गाड्या दिसत आहेत.

# कुटुंबातले कामं सोडून राजकारणात सक्रिय

## लोकसभा निवडणुकीसाठी प्रचाराचा नारळ फुटल्यानंतर आरोप प्रत्यारोप सुरू

**पुणे | प्रतिनिधी**

बारामती लोकसभा निवडणुकीसाठी सुनेत्रा पवार आणि सुप्रिया सुळे यांनी प्रचाराचा नारळ फुटल्यानंतर आरोप प्रत्यारोप सुरु झाले आहेत. सुनेत्रा पवारांच्या प्रचाराला सुरुवात करताना अजित पवारांनी शरद पवारांना लक्ष्य केलं.

बारामती लोकसभा निवडणुकीकडे सगळ्या राज्याचं लक्ष लागलं आहे. सुप्रिया सुळे विरुद्ध सुनेत्रा पवार अशी तगडी लढत बारामतीमध्ये होणार आहे. त्यामुळे महायुतीसह महाविकास आघाडीचे नेते प्रचारात उतरले आहेत. दुसरीकडे बारामतीमध्ये शुक्रवारी सुप्रिया सुळेंनी नारळ वाढवत प्रचाराला सुरुवात केली आहे. त्यानंतर दुसऱ्याच दिवशी सुनेत्रा पवार यांच्याही प्रचाराचा नारळ फुटला आहे. प्रचाराच्या पहिल्याच सभेत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी शरद पवारांसह रोहित पवारांवर निशाणा साधला आहे.



"ही गावकी भाऊकीची किंवा नणंद भावजयची निवडणूक नाही. देशाच्या 135 कोटी जनतेचा कारभार कोणाच्या हातात द्यायचा हे ठरवणारी ही निवडणूक आहे. ही निवडणूक सासू-सुनेची, नणंद भावजयीची निवडणूक नाही. ही भावकीची निवडणूक नाही ही मोदी साहेब आणि राहुल गांधींची निवडणूक आहे. माझ्यावर वेगवेगळे आरोप केले जातात. पण त्यांच्या आरोपामुळे मला काय भोकं पडत नाही. बारामतीची जनता मला अनेक वर्षे ओळखते. माझं लहाणपण येथेच गेलंय," असे अजित पवार म्हणाले

"कालच्या शरद पवारांच्या सभेत अमेरिका टाईम्सचा पत्रकारासह अनेक पत्रकार मंडळी आली होती. यावेळी शरद पवार खुर्चीवर बसले होते. तर सुप्रिया, रोहित आणि युगेंद्र पायापाशी बसले होते. अख्ख कुटुंब जवळ घेऊन बसले होते होते. म्हणजे हे अमेरिकेतही पोहोचलं की बघा कुटुंब कसं एक आहे. पण मी त्यांच्याबरोबर होतो तेव्हा साहेब एकेठिकाणी बसले असतील तर मी दुसरीकडे बसायचो. बारामतीतील सहकारी साखर कारखाने हे शरद पवार यांनी आणलेले नसून ते त्या त्या भागातील जुन्या जाणत्या व्यक्तींना आणल्या आहेत," असं प्रत्युत्तर अजित पवारांनी शरद पवारांना दिलं आहे..

"आम्ही पण आमच्या काळात शेतकऱ्यांची कर्जमाफी केली. काहीजण म्हणतात धमक्या दिल्या जातात. पण मी मनापासून व्यासपीठावरून खाली मान घालून बसलो आहे. कोणी काही बोलले तरी मी काय कुणाला बोलतोय का? यापूर्वी म्हणायचे फक्त दुसऱ्या पिढीतील दादा राजकारणात आहे. त्यामुळे घरातील फक्त मी राजकारणात होतो. बाकी सगळेजण धंदापाणी करत होते. मात्र मागील दोन महिन्यापासून आमच्या कुटुंबातील सर्वांनी धंदा पाणी सोडून राजकारणात सक्रिय भाग घेतलाय. गळ्या शप्पथ खरं बोलतोय," असे अजित पवार म्हणाले.

### रोहित पवार आता जास्तीचे बोलू लागले..

» "आमदार रोहित पवार यांचे वडील राजेंद्र पवार यांनी माझ्या पाठीमागे लागून रोहितला जिल्हा परिषद सदस्य करा असे म्हटले होते. त्यावेळी मी शरद पवारांचा विरोध करून त्यांना जिल्हा परिषद सदस्य केलं. पुढे ते हडपसर विधानसभा मागू लागले. मात्र मी त्यांना कर्जत जामखेडचे आमदार केले. तेच आता जास्तीचे बोलू लागले आहेत," अशा शब्दात अजित पवारांनी रोहित पवारांवर टीका केली. यासोबत काहींना तर आमदारकीची स्वप्न पडू लागले आहेत असे म्हणत युगेंद्र पवार यांच्यावरही निशाणा साधला.

# कडूसमध्ये 100 पेक्षा जास्त विद्यार्थ्यांना विषबाधा

## 4 विद्यार्थ्यांची प्रकृती चिंताजनक : उपचारासाठी वायसीएम रुग्णालयात दाखल

**पुणे | प्रतिनिधी**

कडूस (ता. खेड) येथील दक्षणा फाउंडेशन मधील जेई आणि नीट परीक्षेचा अभ्यास करणाऱ्या परराज्यातील सुमारे १०० पेक्षा जास्त विद्यार्थ्यांना अन्नातून विषबाधा झाली आहे. त्यापैकी २२ मुले आणि ७ मुली असे २९ विद्यार्थ्यांना उपचारासाठी चांडोली (ता.खेड) येथील ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. यातील ४ विद्यार्थ्यांची प्रकृती जास्त खालावलेली आहे.२ विद्यार्थ्यांना वायसीएम रुग्णालयात पाठवािण्यात आले आहे.

दक्षणा फाउंडेशन ही सेवाभावी आणि गैरसरकरी संस्था आहे. ही संस्था देशातील ग्रामीण भागातील आर्थिक दुर्बल परंतु अभ्यासातील हुशार विद्यार्थ्यांना आयआयटी व मेडिकल एन्ट्रान्सच्या जेईई आणि नीट परीक्षेसाठी मोफत मार्गदर्शन करते.



देशभरातून विद्यार्थी याठिकाणी शिक्षण घेण्यासाठी येतात. सध्या येथे सुमारे सहाशे पेक्षा जास्त विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. यातील बहुतांश विद्यार्थ्यांना शुक्रवार (ता.१९) रात्री पासून जुलाब, तीव्र डोकेदुखी व अंगदुखीचा त्रास जाणवू लागला.

शनिवारी सकाळी विद्यार्थ्यांचा त्रास वाढल्याने उपचारासाठी त्यांना कडूसच्या प्राथमिक आरोग्य केंद्रानंतर चांडोली येथील ग्रामीण ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

सुमारे शंभर पेक्षा जास्त विद्यार्थ्यांवर ग्रामीण रुग्णालयात उपचार सुरू आहेत. आणखी काही विद्यार्थ्यांना उपचारासाठी आणण्यात येत असून यात विद्यार्थ्यांनींचा सुद्धा सहभाग आहे.

या विद्यार्थ्यांना उपचारासाठी चांडोली ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. पूनम चिखलीकर, तालुका आरोग्य अधिकारी डॉ इंदिरा पारखे, डॉ कौस्तुभ गरड,डॉ मयुरी मालाविया, अल्ताफ पठाण, अर्चना धोलवड, संध्याराणी हजारे, अर्चना छानवाल, वर्षा गायकवाड, मुख्तार शेख, आशा नवगिरे, धनंजय घोसाळकर, माधुरी गोरडे,संगीता पिंगळे, वर्षा अनंदे,दीपक शेलार यांनी उपचार केले.

दरम्यान उपविभागीय पोलिस अधिकारी सुदर्शन पाटील, तहसीलदार प्रशांत बेडसे, पोलिस निरीक्षक राजकुमार केंद्रे,सहायक पोलिस निरीक्षक बी एन काबुगडे, पोलिस उपनिरीक्षक ज्ञानेश्वर राऊत सह पोलिस टीम यांनी वि द्याथ्र्यांची विचारपूस केली. अन्नाचे नमुने घेत ते तत्काळ तपासणीसाठी पुढे पाठविण्याचे आदेश डीवायएसपी सुदर्शन पाटील यांनी दिले आहेत.

### विद्यार्थ्यांना परीक्षेसाठी मोफत मार्गदर्शन

» दक्षणा फाउंडेशन ही सेवाभावी आणि गैरसरकरी संस्था आहे. ही संस्था देशातील ग्रामीण भागातील आर्थिक दुर्बल परंतु अभ्यासातील हुशार विद्यार्थ्यांना आयआयटी व मेडिकल एन्ट्रन्सच्या जेईई आणि नीट परीक्षेसाठी मोफत मार्गदर्शन करते. देशभरातून विद्यार्थी याठिकाणी शिक्षण घेण्यासाठी येतात. सध्या येथे सुमारे सहाशेपेक्षा जास्त विद्यार्थी शिक्षण घेत आहेत.